महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com agpureduboard.i

पत्र क्र.नाविमं / प.उ.मा. / 636
नागपूर,दि. 21 /02/ 2024

प्रति,

मा. संचालक
माहिती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय
नागपूर विभाग नागपूर

विषय :– फेब्रु –मार्च 2024 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी.) परीक्षेच्या आयोजनाबाबत.

संदर्भ :–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क /परीक्षा– 02/729. दिनांक – 020/02/2024

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च 2024 मध्ये घेण्यात येणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ.12 वी ) परीक्षेच्या आयोजनाबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. तरी सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केद्रांनी बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपीः–

1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.

2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.

3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.

4) मुख्याध्यापक / प्राचार्य ( सर्व जिल्हे) सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये, प्रकटनातील निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

5) मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्रटाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमतसमाचार, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४

### || प्रकटन ||

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणारी **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र** (इ.१२ वी) **ची लेखी परीक्षा बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ ते मंगळवार, दिनांक १९ मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.**

या परीक्षेसाठी एकूण १५,१३,९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. त्यामध्ये ८,२१,४५० विद्यार्थी व ६,९२,४२४ विद्यार्थीनी आहेत. एकूण १०४९७ कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून, या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३३२० मुख्य केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. शाखानिहाय विद्यार्थी संख्येचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | शाखा (Stream) | नोंदणी झालेले विद्यार्थी (Register Candidate) |
|---|---|---|
| १) | विज्ञान (Science) | ७,६०,०४६ |
| २) | कला (Arts) | ३,८१,९८२ |
| ३) | वाणिज्य (Commerce) | ३,२९,९०५ |
| ४) | किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम) (Vocational) | ३७,२२६ |
| ५) | टेक्निकल सायन्स (ITI) | ४,७५० |
| | एकूण विद्यार्थी | १५,१३,९०९ |

### सदर परीक्षेची ठळक वैशिष्टये

१) फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्यात आलेली असून सरल डेटावरुन कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती घेऊन आवेदनपत्रे ऑनलाईन भरलेली आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी दिनांक २०/०२/२०२४ पर्यंत आवेदनपत्रे स्विकारण्यात आलेली आहेत.

२) विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात आले असून परीक्षेदरम्यान महत्वाच्या बहुतांश विषयांच्या पेपरमध्ये खंड ठेवण्यात आला आहे. **मंडळामार्फत प्रसिध्द व छपाई केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.**

३) फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे वेळापत्रक गुरूवार दिनांक ०२/११/२०२३ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेले आहे.

४) परीक्षांच्या कालावधीत अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात अशा विद्यार्थ्यांना नैराश्येतून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरून समुपदेशन करण्यासाठी १० समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विभागीय स्तरावर मंडळामध्ये जिल्हानिहाय प्रत्येकी दोन याप्रमाणे समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच राज्य मंडळ व ९ विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करून हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

५) सदर परीक्षेसाठी नियुक्त केलेले सहाय्यक परिरक्षक (रनर) परीक्षा कालावधीत बैठे पथक म्हणून मुख्य केंद्रावर कार्यरत राहणार आहेत. तसेच त्यांनी परिरक्षण केंद्रावरून गोपनीय पाकिटे ताब्यात घेतल्यापासून ते परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत व वितरीत करेपर्यंतचे चित्रीकरण मोबाईलमध्ये करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

६) प्रश्नपत्रिकेची गोपनीयता अबाधित राहण्यासाठी मुख्य परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका पोहोच करण्याकरिता व उत्तरपत्रिका आणण्याकरिता नेमण्यात आलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी जीपीएस प्रणाली सुरू ठेवणे आवश्यक करण्यात आलेले आहे.

७) सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रातही (Hall Ticket) नमूद करण्यात आलेले आहे. सकाळ सत्रात स. १०.३० वाजता व दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्याने परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळ सत्रात स.११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु.३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

८) **गतवर्षीप्रमाणेच फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेसाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आलेली आहे.**

९) लेखी परीक्षेपूर्वी गैरमार्ग प्रकरणी विद्यार्थ्यांसमोर शिक्षा सूचीचे तसेच उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचनांचे वाचन करणेबाबत सर्व उच्च माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळामार्फत सूचित करण्यात आलेले आहे.

१०) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार गणित, पुस्तपालन व लेखाकर्म, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र विषयांच्या परीक्षांसाठी कॅलक्युलेटर वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. विद्यार्थ्याने कॅलक्युलेटर स्वतःचा आणावयाचा आहे. सदर कॅलक्युलेटर फक्त कॅलक्युलेटर स्वरूपातीलच असावा. मोबाईल मधील अथवा इतर इलेक्ट्रॉनिक्स साधनांमधील कॅलक्युलेटर वापरता येणार नाही.

११) संपूर्ण राज्यासाठी एक नियोजनबध्द व सर्व घटक समावेशक असा 'गैरमार्गाशी लढा' या अभियानाचा कृति कार्यक्रम या वर्षी देखील मंडळाने राबविण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात एकसूत्रीपणा हे तत्व विचारात घेवून याबाबत नियोजन करण्यात आले आहे व त्यानुसार स्थानिक दक्षता समिती व केंद्रस्तर सभा, पालकसभा, विद्यार्थ्यांचे उद्बोधन, इ.द्वारे या अभियानाचा कृति कार्यक्रम संपूर्ण राज्यभर राबविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे परीक्षेशी संबंधित घटकांच्या विशिष्ट वैचारिक मनोवृत्तीमध्ये सकारात्मक बदल होण्यास व परीक्षेतील गैरप्रकार कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

१२) परीक्षा काळातील संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा यादृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहे. याशिवाय प्रत्येक जिल्हयामध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती कार्यरत असून काही विभागीय मंडळात विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना परीक्षा केंद्रांना भेटी देण्याबाबत मंडळाकडून विनंती करण्यात आली आहे. तसेच मंडळ सदस्य आणि शासकीय अधिकारी यांना परीक्षा केंद्राना आकस्मिक भेटी देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१३) **तसेच प्रात्यक्षिक परीक्षा सुरळीत व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व योजना), सर्व गटशिक्षणाधिकारी तसेच शिक्षण विस्तार अधिकारी यांना प्रात्यक्षिक परीक्षा काळात कमीत कमी १० उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देणेबाबत सूचित करण्यात आले आहे.**

१४) सर्व मा. विभागीय आयुक्तांना तसेच मा.जिल्हाधिकारी यांना अर्धशासकीय पत्र पाठवून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व अधिक जबाबदार भावी पिढी निर्माण व्हावी याकरीता व परीक्षा पध्दतीवरील विश्वास व आदर वृध्दींगत होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांच्या मदतीने 'गैरमार्गाविरूध्द् लढा' हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले आहे.

१५) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना राज्यामध्ये कॉपीमुक्त अभियान राबविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

१६) केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक व परिरक्षक यांच्या विभागीय मंडळ स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

१७) **राज्य मंडळ कार्यालयामार्फत सर्व विभागीय मंडळ अध्यक्ष, विभागीय सचिव, इतर अधिकारी यांच्यासह शिक्षण उपसंचालक, सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक, योजना)व प्राचार्य, जिल्हा संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करून परीक्षा नियोजन व इतर बाबींसंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.**

१८) राज्यमंडळामार्फत सर्व विभागीय मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन कामकाजाचा आढावा घेतलेला आहे.

१९) मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.२०/०३/२०२४ ते २२/०३/२०२४ या कालावधीत Out of Turn ने आयोजित करण्यात आलेली आहे.

२०) **फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या परीक्षेपासून प्रथमच प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal), श्रेणी इ. परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरून घेण्यात येणार आहेत. याबाबतची लिंक व सविस्तर सूचना विभागीय मंडळांमार्फत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.**

२१) २५ प्रश्नपत्रिकांचे सिलबंद पाकिट पर्यवेक्षक आपल्या परीक्षा कक्षातील दोन परीक्षार्थ्यांची स्वाक्षरी घेवून व तदनंतर स्वतःची स्वाक्षरी करून उघडतील. त्याचे यादृच्छिकपणे (Randomly) चित्रिकरण रनर मार्फत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखण्यास आणखी मदत होणार आहे.

२२) विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन प्रवेशपत्र (हॉलतिकीट) देण्यात आलेली आहेत. सदर प्रवेशपत्रावर मराठी व इंग्रजीतून सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रवेशपत्रावर विषयासमोर दिनांक व परीक्षा कक्षात उपस्थित राहण्याची वेळ याचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

२३) परीक्षांच्या कालावधीत गैरमार्गास आळा घालण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या भरारी पथकांच्या भेटीचे नियोजन विभागीय मंडळ स्तरावरून करण्यात येणार असून ज्या त्या पेपरच्या दिवशी सकाळी संबंधित भरारी पथकांना नियोजन देण्यात येईल.

२४) प्रचलित पध्दतीप्रमाणे 'माहिती तंत्रज्ञान' या विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाणार असून या विषयासाठी एकूण **१,९४,४३९** विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सदर विद्यार्थी **२०६१** केंद्रावरून परीक्षेस प्रविष्ट होणार आहेत.तसेच 'सामान्यज्ञान' या विषयाची परीक्षा ऑनलाईन होत असून या विषयासाठी एकूण **१,९७४** विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली असून ४० केंद्रांवरून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत.

२५) उपरोक्त बाबी वेळोवेळी सर्व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना कळविण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरप्रकारांच्या प्रलोभनांना बळी पडू नये. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) व उत्तरपत्रिकेवरील सूचनांचे काळजीपूर्वक वाचन व पालन करावे.

२६) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) मुख्य परीक्षेच्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा सर्वसाधारणपणे जुलै-ऑगस्ट मध्ये आयोजित करण्यात येत आहे.

२७) विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास विभागीय मंडळाच्या हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन मिळण्यासाठी खालीलप्रमाणे हेल्पलाईन क्रमांक दिलेले आहेत.

विभागीय मंडळनिहाय – हेल्पलाईन दूरध्वनी क्रमांक

| अ. क्र. | विभागीय मंडळ | दूरध्वनी क्रमांक | अ.क्र. | विभागीय मंडळ | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | पुणे | मो.क्र.७०३८७५२९७२ | ५) | कोल्हापूर | ०२३१-२६९६१०१<br>०२३१-२६९६१०२<br>०२३१-२६९६१०३<br>मो.क्र.९०११८३३५३५<br>मो.क्र.७६२०८५१९५२<br>मो.क्र.९४२०७७९३२० |
| २) | नागपूर | ०७१२-२५५३५०७<br>०७१२-२५५३५०३<br>मो.क्र.९४०४३३९९९२<br>मो.क्र.७७०९१५७१७२<br>मो.क्र.७०२०७३७४३४ | ६) | अमरावती | ०७२१-२६६२६०८ |
| ३) | छत्रपती संभाजीनगर | ०२४०-२३३४२२८<br>मो.क्र.८३७९०३५५७२<br>मो.क्र.९४०३४०६७२५<br>मो.क्र.९४०४५२६०३६ | ७) | नाशिक | ०२५३-२९४५२५५<br>०२५३-२९४५२५६<br>मो.क्र.९२७००७१७६१<br>मो.क्र.८६०५४०९८७१<br>मो.क्र.९१४६५४१७७३<br>मो.क्र.९४२१५५८२३० |
| ४) | मुंबई | ०२२- २७८८१०७५<br>०२२ -२७८९३७५६<br>मो.क्र.९८३३३६९३३०<br>मो.क्र.९८१९८०६१०९ | ८) | लातूर | ०२३८२-२५१७३३<br>मो.क्र.९४०५०७७९११<br>मो.क्र.८३७९०७२५६५<br>मो.क्र.९४२३७७७७८९<br>मो.क्र.७७६७८२५४९५ |
| | | | ९) | कोकण | ०२३५२-२२८४८०<br>०२३५२-२३१२५०<br>मो.क्र.९६७३०८००७७<br>मो.क्र.९८२२३९७७९०<br>मो.क्र.९७६३८७७७२७ |

तसेच राज्यमंडळ स्तरावरही हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून त्याचे दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. ०२०-२५७०५२७१, ०२०-२५७०५२७२

**परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा !**

दिनांक- २०/०२/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४